## प्रकरण तिसरे

## ‘खळाळ’मधील समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण

# प्रकरण तिसरे

## 'खळाळ' मधील समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण

### प्रास्ताविक -

श्री. आनंद यादव यांचा 'खळाळ' हा कथासंग्रह १९६७ मध्ये प्रकाशित झाला. प्रथमावृत्ती 'मौज' प्रकाशनानं प्रसिध्द केली. दुसरी आवृत्ती १९८४ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी काढली. सदरच्या शोधनिबंधासाठी 'खळाळ'ची दुसरी आवृत्ती वापरात घेतली आहे.

'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रसंग्रहाहूनही 'खळाळ' कथा संग्रहामध्ये विषयाच्या दृष्टीने विविधता आहे.

'मातीखालची माती' या पुस्तकात संग्रही करण्यात आलेली व्यक्तिचित्रे लिहीत असताना व्यक्तिचित्राचा म्हणून जो साचा होता त्याचे दडपण स्वाभाविकपणेच यादवांच्या मनावर असणार. माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रांचा त्यांच्यावरील प्रभाव यामुळेही त्यांच्या व्यक्तिचित्राला काहीसे विशिष्ट स्वरूप आले आहे. हे मागील प्रकरणात आपण पाहिलेच. 'कथालेखक' म्हणून 'खळाळ' हा त्यांचा पहिला संग्रह होय. लेखक म्हणून खास यादवांची अशी वैशिष्टये या संग्रहात उतरलेली असणे स्वाभाविकच अपेक्षित आहे. तेव्हा 'खळाळ' या संग्रहातील कथांमध्ये समाजाचे, व्यक्तिमनाचे चित्रण करण्याची यादवांची कोणती वैशिष्ट्ये प्रकट होतात, ते आपण पाहू.

### समाजाचे चित्रण -

अनेक घटकावयवांनी समाजाची बांधणी होत असते. समाजाचे चित्रण करताना ते घटक येत राहतात. समाजचित्रणाचा विचार करताना

शेती, जातीयता, धर्मविचार, श्रध्दा, संकेत, कुटुंबरचना या घटकांचा विचार करावा लागतो. समाजाची स्वतंत्र अशी एक विचारसरणी असते. विशिष्ट विचार-परंपरेने एक संस्कृती निर्माण झालेली असते आणि त्या संस्कृतीमुळेच त्या गटाचे समाजाहूनही वेगळेपण सिध्द होत असते. बहुजन समाजाच्या राहणीमानावरून, वैचारिक पातळीवरून त्या समाजाचे बौध्दिक, नैतिक मूल्यांकन करता येते.

समाजचित्रणासाठी ग्रामीण परिसरातले अनेक संदर्भ यावे लागतात. शेती हा मुख्य व्यवसाय, त्याभोवती असणारे सारे व्यवसाय, बलुतेदारी, जात, धर्म त्यांची खोलवरची परंपरा या सर्वांचा समावेश असलेली ग्रामीण सामाजिकता असते. 'खळाळ' मधील कथात सामाजिकतेचे चित्रण कोणत्या प्रकारे आले आहे, ते पाहू.

शेती, शेतकरी व शेतमजूर यांचे चित्रण -

ग्रामीण भागात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. सुमारे ७५ ते ८0 टक्के लोक शेती हाच व्यवसाय करतात. शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. म्हणून ग्रामीण परिसरामध्ये आणि एकंदर जीवनव्यवहारामध्ये शेतकरी हाच विशेष महत्त्वाचा मानला गेला. त्या परिसरातील प्रबळ व्यवसायाशी संवादी-पूरक दुय्यम दर्जाचे व्यवसाय सुरू होतात. म्हणून शेती व्यवसायाशी बांधले गेलेले शेतकरी आणि शेतमजूर यांचा नित्याचा अनेक प्रकारांनी संबंध आला, हे संबंध किती वेगवेगळ्या स्वरूपांनी आले हे पाहणे क्रमप्राप्त आहे.

सधन शेतकरी रामू (उनाच) आपल्या शेतात राबतो. आडद्रा-पावसात रोजगाऱ्याचा ताफा पेरणीला गेला होता. आडद्रा चळाळल्याने पेरणीची 'घातमोड' झाली. पेरणीच्या वेळी जास्त काम लवकर कसे होईल इकडे शेतमालकाचे ध्यान तर कामाचा खोळंबा होऊनही पगार मिळेल का ?

याची चिंता रामज्या आदी शेतमजूरांना आहे. शेतीचं काम असलं तरीही आनंद आणि नसलं तरीही आनंद मानणारा, एकट्या जिवाला खाऊन-पिऊन सुखी राहणारा 'राजावाणी' माणूस शेतमजूर म्हणून काम करत असतो.

येश्या (धुणं), भिक्या (चाकरी), मित्या (इंजेन) ही सर्व माणसं दुसऱ्याच्या शेतावर काम करताना शेतकऱ्याच्या वातावरणासह ही सारी माणसं त्या त्या पार्श्वभूमीवर उभी आहेत. शेताची सारी कामं केवळ आपणालाच माहित आहेत. मालकाचा - नारायण निबांळकराचा आपणावर खूप विश्वास आहे. हे तो गडी भिक्या सांगतो आहे (पृ.२०)

'गाळ', 'मोट' यासारख्या कथा शेती व्यवसायाशी निगडित आहेतच शिवाय त्या 'गाळ' मधील निवेदनात येणारी सूक्ष्मता कथाकाराचे मार्मिक अवलोकन किती खोलवरचे आहे, याचा प्रत्यय देऊन जाते.

पावसाळ्यात पेरणी झाली की शेतकामांना गती येते. पेरणी भांगलण, कापणी, मळणी वगैरे शेतकामं चालतात. सुगीच्या दिवसात भुईमुगाच्या शेंगा तोडणे यासारखी सामान्य कामं बायका करीत असतात. बायना - दत्तू सुगीच्या दिवसात गूळ खुडायला, कापूस वेचायला, भात बडवायला जातात. दत्तूनं घाण्यात कधी फडकरी, कधी घाणकरी म्हणून कामं केली. लावणी करणं, गंजी रचणं अशी विविध कामं दत्तूनं केली आहेत. (पृ.५३) प्रेमकथेला शेताची पार्श्वभूमी 'बाळा पाडा', "धुणं" या कथांमध्ये आहे 'बाळा पाडा' आणि 'धुणं' या दोन कथांमध्ये शेताचा पार्श्वभूमी-प्रमाणे उपयोग करून घेतला आहे. शेताच्या पार्श्वभूमीवर बहुतांशी कथा-भाग घडविला जातो. शेतकरी हा शेती व्यवसायाशी एकरूप झाला आहे का ? मित्या (इंजेन) आणि बानू (मोट) हे दोघेही शेतकामामध्ये तरबेज आहेतच शिवाय विशेष म्हणजे शेताशी इमान राखून आहेत. त्यांच्या राबण्यात प्रामाणिकपणा आहे. एका व्यक्तीच्या विचाराने (शेतमजूराच्या) मालकाचा विचार पालटत नाही. मालक हा व्यवहारी आहे म्हणून

त्यांचा प्रामाणिकपणा हाच त्यांना क्लेशदायक झाला आहे·

आनंद यादवांच्या कथांमध्ये चित्रित झालेला शेतकरी हा शेत-मालक नसून तो सामान्यत: चाकर आहे· मात्र मालकाचे शेत हे स्वत:चेच शेत आहे अशा निष्ठेने तो शेतातील कामे करीत असतो, शेताची काळजी घेतो· ही कामे किती विविध प्रकारची आहेत याचा उल्लेख 'चाकरी' सारख्या कथेत येतो· बैलांना वैरण घालणे, वैरणीच्या गंजीला खूण करून ठेवणे, बैलासाठी भरडा आणणे इ· (पृ· १४) मालकापेक्षाही बैलाची काळजी हा गडी जास्त घेतो· 'धूर्ण' मधील येश्या मोट हाकीत असतो· बायकांच्या धुण्याने पिकाला धात्याचे पाणी दूषीत होऊ नये याची काळजी तो घेतो· ज्या बैलावरती प्रेम केलं तो हि-या बैल मेल्यानंतर त्याच्या कातड्याची मोट चालू करताना बाबूच्या मनाला यातना किती होतात याचे चित्रण यादवांनी 'मोट' या कथेत केलेले आहे· 'इंजेन' कथेतील सिल्यागडी शेतीची काळजी घेतोच पण मालक करतो त्यापेक्षाही बैलावर जास्त प्रेम करतो· आपल्या घराला उर्जितावस्था आणण्यासाठी म्हैस विकत घेता यावी म्हणून वर्षानुवर्षे बायना, तिचा नवरा आणि तिची पोरे कसे कष्ट घेतात व म्हैस विकत घेतल्यानंतर सुरवातीची भावना तिच्या अंत:करणात कशी ओतप्रोत भरून राहते याचे चित्रण 'सुख' या कथेत लेखकांने चांगल्या प्रकारे केले आहे·(पृ·४७-५५)

आनंद यादवांच्या 'खळाळ' मधील कथांचा नायक हा शेतमजूर असल्याने त्याचे चित्रण जसे अनेक अंगानी येते तसे शेतक-याचे अथवा शेता-च्या मालकाचे विविधांगी चित्रण मात्र येत नाही· जनावरांची उपेक्षा करणारा अथवा प्रसंगी निर्दयही बनणारा शेतकरी फारसा वास्तव वाटत नाही· अशाप्रकारचे चित्रण केल्याने शेतमजुराचा गौरव होतो· पण शेतक--याचे चित्रण अवास्तव वाटते शेतकरी आणि बलुतेदार अथवा शेतकरी आणि अन्य जाती यांच्यातील परस्पर संबंधाचे - सौहार्दाचे अथवा विरोधाचे --

चित्रणही फारसे येत नाही म्हणून ग्रामीण शेतकरी व शेती व्यवसायावर जगणारे खेडे यांचा प्रत्यय त्यांच्या कथांतून यावा तसा येत नाही·

दारिद्र्याचे चित्रण -

ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे प्रभावी चित्रण यादवांच्या 'खळाळ' मधील कथांत येते· शेतकऱ्याचे सुगीचे दिवस, उन्हाळ्याचे दिवस पोटाची फारशी आबाळ न होता संपतात पण वर्षाचे शेवटचे म्हणजे घरातील धन-धान्य संपण्याच्या कालावधीतले पावसाळ्यातले दिवस जास्त त्रासदायक वाटतात· आर्थिक कुचंबना तर होतेच शिवाय धान्यसाठा संपल्याने उपासमारीला सुरुवात होते·

जयाशा, पांडा आणि दत्तबा ही 'ओझं' वाहणारी मंडळी दारिद्र्याशी सातत्याने सारीपाट खेळत आहेत· पांडाचा बैल मेला· जयशा सडा हमाल आहे· दत्तूबा आणि त्याची बायको - केवळ पती पत्नीच, मुलाबाळांशिवाय आहेत· पांडा तसा बायको-मुलांचा माणूस आहे· विटा नेताना गाडी मोडली· भाडं तर मिळालचं नाही पण त्याची मुलगी 'सांजवेलच्या जुंधळ्यासाठी' पैसे मागायला आली आहे· (पृ·१४४) जगणे हेच कठीण झाले आहे· शरीराचं अस्तित्व असणं हेच त्याना 'ओझं' वाटत आहे भूक भागवितानाही ती हमाल मंडळी त्रासिक बनली आहे· शरीर जगेपर्यन्त ती नाइलाजाने रडतराऊ जगणार होती·

दारिद्र्याच्या विशाल पार्श्वभूमीवर 'बखार' ही कथा रेखाटलेली आहे· सुबऱ्या, ओमाना, गंगाराम आदी महार वखरीत लाकडं फोडण्याचं काम करतात· " मस्तर तरी जगायला पाहिजेच की" अशा उदासवृत्तीनं ती जगत असतात· कोणाच्यातरी मर्तीकावर ती जगत होती· एकाचं मरण-त्या प्रेतासाठी सरपण - सरपण विक्रीतून येणारी रक्कम आणि त्यातून या महारांचं जगणं असं हे चक्र चालू आहे· येथली सारीच महारं

जगण्याला कंटाळलेली आहेत. पोटाचा खळगा भरणे या व्यतिरिक्त दुसरा कोणताही विचार त्यांच्या ठिकाणी नाही. त्या पात्रांचे विचार विश्वच उथळ आहे. 'मुधा' ही याच स्वरूपाची आणखी एक कथा आहे. धर्मा पाटलाचा नऊ-दहा महिन्याचा मुलगा खोकल्या-तापानं संपला. प्रेताला मातीआड करून घरी परत आलेल्या नरसूला आपलं पोर तापाने आजारी आहे याची जाणीव होते. पारू-नरसूने गावात उसनवारीने पैसे मागितले पण कोणीही देत नाही तेव्हा नरसू गार उकरून मुधा घेऊन घरी येतो तर जयसिंगाची (पुत्ररत्न) जीवनयात्रा संपलेली असते. काम करणाऱ्या माणसालाही अडचणीच्या वेळी पैसे उपलब्ध होऊ नये ही विशेष बाब आहे. मानसिक कोंडी झालेला माणूस अशा नव्या, न पटणाऱ्या वाटा शोधू लागतो. दारिद्र्याच्या भयानक पार्श्वभूमीवर हे कुटुंब (नरसू-पारू) उभे आहे.

पेरणीच्या वेळी आडद्रा जास्त चळाळल्याने घातमोड झाली. जास्त पाऊस झाल्याने दोन दिवस न येण्याविषयी रयताने सांगितले तर रामज्याने पावसाला शिवी देऊनच म्हटले, "च्याऽयला, आता दोन दीस पोटाला बिब्बा घालून कोंक कोंक करत घरात बसावं पाहिजे." (पृ. ११२) भूकेचा हा प्रश्न रोजगाऱ्याच्या जीवनाला भुतासारखा लागला आहे.

'वरातीचा शालू' ही कथा वैधव्य, दारिद्र्य आणि अंजनाच्या मनावरील ताण या तिपेडीची वीण आहे. पति निधनानंतर आर्थिक परिस्थिती कोलमडली. दारिद्र्य आणि पूर्वस्मृती यातच ती अंजना गुंतून राहिली. संमिश्र स्वरूपाची ही कथा तिच्या मनाची घालमेल दर्शविते.

मराठी ग्रामीण साहित्यामध्ये केवळ व्यंकटेश माडगूळकर आणि शंकरराव खरात यांनीच दारिद्र्याचे वर्णन समर्थ शब्दात रेखाटले आहे. धर्मा रामोशाच्या न्याहरीचे वर्णन करताना, "काशाच्या लखलखीत थाळीत कसल्यातरी पालेभाजीचा उकडलेला लगदा आणि तांबड्या रंगाची अर्धी तीन चतकोर भाकरी होती. बाजूला ठेवलेल्या पाण्याच्या तांब्यावर एक हात ठेवून

धर्मा एक एक घास सावकाश खात होता'[१] हे वर्णन अत्यंत प्रत्ययकारी आणि चित्रमय आहे. माणसाच्या दारिद्र्याविषयीचा नकाशा क्रमवार उलगडावा तसे घडत जाते. त्याच कथेत शेवटी आलेले उदाहरण खूप सूचवून जाते. "धर्माला दिलेलं धोतर बजानं लुगड्यासारखा उपयोग करून नेसलं होतं."[२] साक्षात चित्रपट उलगडल्याचा भास होतो.

"रामा मैलकुली 'मी दिलेलं जेवण आपल्या भाच्यासाठी फडक्यात बांधून ठेवतो"[३] या एकाच आशयघन वाक्यात अनेक सूक्ष्म अर्थ आहेत त्याचे दारिद्र्य भाच्याविषयी माया, गरीबाला उच्छिष्ट अन्न मिळालं म्हणून असणारा आनंद-सूक्ष्म अर्थच्छटा सोबतच दारिद्र्याचे विदारक दर्शन घडते.

शंकरराव खरात यांच्या 'सांगावा' कथेची सुरवातच कथेचा मुख्य आशय सांगते. मयताचा सांगावा द्यायला गेलेल्या बापाची वाट पाहून पोर झोपी जातं. सांगावा सांगितल्यावर भाकरी दही-भात वाढण्याची रीत आहे. भूकेपोटी ते आपणाला खाता येईल ही पोराची आस आहे. मध्येच खडबडून जागे झालेल्या मुलानं प्रश्न विचारलाय, "बानं भाकरी आणलीया ?"[४]

भूक ही सर्वव्यापी आणि सर्वभक्षी आहे. कोणाही प्राण्याला ती सुटलेली नाही. खूप खोलवरचे आणि सरळ असे भाव टिपण्याची कलात्मकता माडगूळकर आणि खरात यांनी दाखविली आहे. आनंद यादव यांच्या 'खळाळ' मधील काही कथांत दारिद्र्याचे विदारक स्वरूपाचे चित्रण येते.

## जातिव्यवस्थेचे चित्रण -

नागर संस्कृतीच्या मानाने ग्रामीण संस्कृती ही जातीव्यवस्थेच्या दृष्टीने अधिक वेगळी असते. जाती-जातीसंबंध हे दृढमूल झालेले असतात. पारंपारिकतेने एका प्रकारचा मनोधर्म आपोआपच निर्माण झालेला असतो.

महार मांग हा तसा दरिद्री समाज आहे. गरीबीमुळे अंगावर कपडे सुध्दा धड नाहीत अशा अजागळ बावळट आणि घाणेरड्या पेहरावातली बायना स्वत:ला "म्हारीण" म्हणते पण येथे उल्लेखाशिवाय जास्त खोली दिसत नाही. लाकडं फोडणं, स्मशानात शेणी नेऊन टाकणं वगैरे कामं महार करतात. सुगी मागून, वटी घेऊन त्यावरच ही कामं त्यांना करावी लागतात. (वखार पृ. ७०) मेलेलं जनावर सोलणं हा तर त्यांचा हक्कच (पृ.१३५) बलुत्याचा चांभार दास्ती आणि मुसळ घेऊन बैल चेचायचं काम करीत असे. शेजारचे मळकरी हजर ठेवून (बैलाच्या आणि बैल) चेचायचं काम उरकलं. शेजाऱ्याची त्यामध्ये कामगिरी कशी, काय आणि कोणती याचा सुस्पष्ट उल्लेख किंवा घटना दर्शविली नाही.

ग्रामीण जीवनामध्ये बलुतेदारी ही अपरिहार्यतेने येते. प्रत्येक जातीचा असा एक स्वतंत्र गट निर्माण होतो. जाती अंतर्गत भांडणे असतात-ही पण दुसऱ्या जातीशी भांडतानां त्यामध्ये समझौता होऊन एकोपा निर्माण होतो. याचे खूपसे चित्रण - व्यंकटेश माडगूळकर किंवा शंकर पाटील यांच्या कथांमध्ये येते. आनंद यादव यांच्या कथांमध्ये जातीजातीमधील संबंधाने चित्रण कितपत येते ते पाहू.

गणा चलपत्याला बघून गोपा व्हरल जागचा उठला नाही. शिवाय बोकडाचा व्यवहार करताना तेथे गोपा व्हरल म्हणतो, " मग एखादा रेडा कापून खा की. बोकडाची चव कशाला तुमाला ?" यावरच त्याचा अहंकार दुखावला आणि गणा चलपते म्हणतो, " गावात राहणार नाहीस तू ! देशोधडीला लावीन तुला !" ) संबंध मराठा समाज विरोधी व्हरल-वाडा असा संघर्ष सुरू होतो.

असा संघर्ष यादवांच्या कथांत कोठेच दिसत नाही. भिक्या (चाकरी) पोटासाठी निमूटपणे चाकरी करताना दिसतो. खेडेगावातला एखादा श्रीमंत दुबळ्या माणसाला धाकाखाली घालण्याचा प्रयत्न कसा करतो

याचे वर्णन 'बोजा' या कथेत येतो. नाल्या नेव-याची कोंडी करून, त्याची कुचंबना करून गणा चक्रपत्याने त्याची जमीन घशाखाली घालण्याचा विचार केला.[६] असा आर्थिक कोंडमारा झालेले एखादे पात्रसुद्धा यादवांच्या लेखनात नाही. संघर्षात खूप खोलवरचे चित्रण येते ते समाजसापेक्ष नव्हे तर व्यक्तिसापेक्ष होय. व्यक्तिमनाभोवतीच गुंजन करणे याशिवाय इतर समाजसापेक्ष पैलू येथे पहावयास सापडत नाहीत. बलुतेदाराचे चित्रणही येत नाही.

श्रद्धा-संकेत इत्यादींचे चित्रण -

श्रद्धा-संकेतांचे चित्रण 'खळाळ' मध्ये किती समर्थपणे साकार करण्यात आले आहे किंवा नाही त्याची चिकित्सा करावयाची आहे. लेखकाच्या संवेदनशील मनावर समाजातल्या घटनांचा आघात होत असतो. संवेदनेतूनच शेवटी साहित्याची निर्मिती होत असते. समाजाचा न टाळता येणारा एक धागा, समाजाचा अंत:प्रवाह साहित्यामध्ये असतो. 'उंब-यावर बसू नये, रात्री बासरी वाजवू नये, गुडघ्यात मान घालून बसू नये, बोडक्या (विधवा) बायकांनी बासरी ऐकू नये.' या आणि अशा स्वरूपाच्या अनेक गोष्टी (संकेत) खाला सांगते. त्यामध्ये हिंदू संस्कृती आणि हिंदू संस्कृतीशी संबंध असलेल्या या मुसलमान स्त्रीची एकंदर जीवनदृष्टी साकारते.[७]

कान कोरून पोट भरणा-या बरबाधा कंजा-याची मुलगी-'निल्ली' चार-सहा महिन्यातच विधवा झाली. नंतर लगेचच ती हैद-याबरोबर पळून गेली. विधवेने अखेरपर्यन्त नव-याघरीच रहायला हवे असा त्या समाजाचा दंडक तिने मोडला म्हणून जातपंचायतीकडून बाप बरबाधाला शिक्षा दिली जाते. बरबाधा ती कान कापण्याची शिक्षा नाकारतो. संपूर्ण कंजारी जमातीचे संकेत स्पष्टतेने जाणवतात. संकेत-शिष्टचाराच कथाव्याप्त विषय बनले आहेत.[८]

'रामव्वा' ऐन तारुण्यात असतानाही 'वडारणी' म्हणून अंगात चोळी घालू शकत नाही. सामाजिक संकेत किती प्रबळ असतात त्याचे ते उत्तम उदाहरण आहे.९.

माडगूळकर बंधू आणि अण्णाभाऊ साठे यांच्या या कथा त्या त्या समाजाचे सामग्र्याने दर्शन घडवितात. जातीतले संकेत, श्रद्धा व्यक्तिजीवनाहूनही श्रेष्ठ आहेत हे दर्शविले आहे. त्या तुलनेत 'खळाळ' मधील संकेत क्षीण वाटतात. संकेतांचा, श्रद्धेचा केवळ उल्लेख येतो. ती कथावस्तू बनू शकत नाही. 'श्रद्धाळूपणा' हा ग्रामीण जीवनाचा फार मोठा भाग यादवांच्या कथांत अल्प प्रमाणात चित्रित होतो.

'मुलं होणं' म्हणजे देवाघरची दानत आहे. हे आपले मत निःसंकोचपण 'सातव्या' मुलाचे वेळी 'गिरजा' मांडते (पृ.१०६) चार पोरीनंतर जन्मलेला मुलगा मुळातच कौतुकाचा-अपूर्वाईचा आहे पण तो दगडाधोंड्यासारखा राहू दे म्हणूनच त्याच नाव 'धोंड्या' च असू दे अशी धारण आहे.(पृ.१८) आलूड बोटांची स्त्री सदैव दरिद्रीच असते. असा संकेत आहे. हरभ-याच्या घाटयाएवढाली बोटं असणा-या 'सून' हौसाचा उल्लेख "कोंबडीच्या पायाची" असा केला जातो (पृ.१२६) गळ्यातल्या डोरल्यात पेटीचा हत्या बांधण्याची पद्धती ही मूळची ग्रामीण परिसरातील पद्धती आहे. सून हौसाला सासूनं उत्तराधिकारी म्हणून पेटीचा हत्या दिला.(पृ. १२२)

विशिष्ट जातीधर्मानुसार विधी वेगळेवेगळे होतात. लिंगायत-मुसलमानामध्ये प्रेत दफन केले जाते. जनवाड्याच्या म्हाता-याचं प्रेत पुरलं जातं.(पृ.६८) दात न आलेल्या मुलाचे प्रेत दफनच केले जाते. तेथे कोणत्याही जाती धर्माचे संबंध येत नाहीत. धर्मा पाटलाचं नऊ-दहा महिन्याचं पोर उगवतीला माथा आणि मावळतीला पायसं करून मातीआड केलं जातं. पृ.(८४) संस्कारातील ही विविधता अशी साकार झाली आहे. व्यक्तिमनातील काहूर दर्शविण्यासाठी मध्यान्ह रात्रीच्या वेळी घुबडाच्या ओरण्याचा संदर्भ

दिला आहे·(पृ· ५७) घुबडाचा आवाज ज्याचा कानी पडतो त्याचे वाईट होते असा एक समज आहे·

'वारकरी' या आत्मनिवेदनपर कथेतील निवेदक संपूर्ण जीवनात नागविला गेलेला असतो· ह्या लंगड्या माणसाची बायको पळून गेलेली असते· चुलता सांभाळण्याच्या मिषाने त्याचे शेत बळकावून बसतो· पंढरीच्या वारीला निघालेला हा माणूस अखेरीला ईश्वर अस्तित्वात आहे का नाही असा संशय घ्यायला लागतो· ह्या स्वत:च्या संशयानेच तो व्याकूळ होतो· तो देवाला म्हणतो, " ···देवा, नगं ही आता संशिवाची श्याण कालवायची वासना· तू हाईस असं आजपातोरं वाटत आलं, म्हणून कसाबसा जगत आलो· आता वाचा बंद कर; तुझा काळा गारगार हात पाठीवर फिरवून वैकुंठात फूक मला आता·" जीवनात पराभूत झालेल्या माणसाची धर्मश्रध्दाही कशी भंग पावते याचे मानसिक पातळीवरील चित्रण लेखकाने या कथेत केलेले आहे·

एकंदरीत 'वारकरी' या कथेसारख्या कथेचा अपवाद वगळला तर ग्रामीण जीवनातील धर्मश्रध्दा, अंधश्रध्दा, संकेत हे विषय यादवांच्या कथेचे विषय फारसे बनताना दिसत नाहीत· ग्रामीण जीवनातील हा एक महत्त्वाचा विषय कथावस्तूमधून त्यांच्या कथांमध्ये फारसा साकार होत नाही·

कौटुंबिक जीवनाचे चित्रण -

समाजजीवनाचा प्राथमिक घटक म्हणजे कुटुंब होय· व्यक्तिजीवनाला स्थैर्य प्राप्त होते ते सुध्दा कुटुंबामुळेच· कुटुंब संस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे· स्त्री पुरुषांचे विविध नातेसंबंध, आई-वडिल, बाप,मुलगा, सासू सुना, सून-सासरा , नणंद - भावजय, बहिण-भाऊ, आजोबा-नातू असे विविधांगी नातेसंबंध पाहणे महत्त्वाचे ठरते· पुरुषप्रधान समाजरचने-

मुळे स्त्रीला गौणत्व येते. विभक्त कुटुंब असो किंवा संयुक्त कुटुंब असो तेथे पुरुषाच्या मर्जीनुसारच सारे व्यवहार चाललेले असतात.

'खळाळ' या कथासंग्रहामध्ये कुटुंबरचनेत तशी विविधता आहे का ते पाहावयाचे आहे. कुटुंबाच्या पारिधातून माणसाला सुटका नाही. कुटुंबातला एक घटक म्हणून सुख-दु:खे भोगावीच लागतात. विभक्त कुटुंब असो किंवा संयुक्त कुटुंब असो त्या आकारपरत्वे समस्या ह्या कमी-जास्त असतात. बायना-दत्तू (सुख) एक सुखी कुटुंब आहे. दोन मुलं आणि हे माय-बाप असे चार माणसांचे हे रोजगारी कुटुंब सुखा-समाधानासाठी सतत राबत आहे. मुलाचं बारसं व्यवस्थित घालता यावं म्हणून (चाकरी गडी) बाप भिक्या धडपडतो आहे. मुलाच्या औषधोपचारासाठी पैशाची गरज भासली म्हणून इतराकडे नरसूने पैसे उसने मागून पाहिले, पण कोणीही दिले नाहीत म्हणून शेवटी तो धर्मा पाटलाच्या मुलाची गार उकरतो. येथे चौकोनी कुटुंब असलेतरी कुटुंबांतर्गत संघर्ष फार नाही. बाह्य घटनांचाही खूप खोलवर परिणाम झाला नाही हे ही तितकेच खरे आहे. 'सातवं' सारखी कथा गिरजाच्या मनस्वी समाधानी मनाचे, कुटुंबाचे चित्रण करते... 'माझा दाल्ला मला पोरागत मिळालाय...'(पृ. १०५) या वाक्यातून नव-याबद्दलची सहजीवनाची प्रीती, त्याचा मनमिळावू स्वभाव; प्रसंगी जास्त कष्ट उपसण्याची तयारी या सर्वांचे एकदमच दर्शन घडते. 'सुख' आणि 'सातवं' मधील नायिका कारभारणी म्हणून नजरेत येतात.

सुनेला सांभाळून घेणारी हौसाची सासू खूपच संमजस आहे. सोशीक आहे.(सून) तर याचे बरोबर उलट सुनेला सुईच्या टोकावर उभी करणारी कमळीची सासू कुंजारीणीच्या स्वभावाची आहे. जाचाला कंटाळूनच मचाल्याची कमळी मुलासकट काळबराच्या हिरीत पडली. आयुष्याला कंटाळणारी जशी पुरुषपात्रे (राजावाणी, वारकरी) आहेत तशीच स्त्रीपात्रे (सासुरवाशीण) सुध्दा आहेत.

रंगानं गोरी पण खुळी असल्यानं लाजेचा प्रश्न नसलेली चंद्री धर्मशाळेत किंवा स्टॅन्डच्या जवळपास राहते· जगण्यासंबंधी तिरस्कार आहे· मरण येत नाही अशा विचित्र मनःस्थितीत अनेक पात्रे वावरताना दिसतात· आपण का जगतो ? हा प्रश्न कोणाही पात्राला पडत नाही·

कुटुंबकथेचे शिल्पकार म्हणून मानले जाणारे शंकर पाटील यांच्या व्यक्तिकथा सहजपणे कुटुंबकथा बनतात· पात्राची कथा वाचकाच्या मनात संक्रमित होते आणि ती कथा सर्वांची बनते· शंकर पाटील यांच्या कथेतील स्त्री . केव्हाही कुटुंब उध्वस्त करत नाही· आजारी नवऱ्यास बरं वाटत नाही याचं कारण जन्माला आलेली मुलगी असा संशय आल्यावर नवऱ्यावरूनच तान्हया बाळाला उतरून परड्याच्या अंगाला ठेवणारी 'हिरा' ध्यानात राहते·[१°] नवऱ्याला बरं वाटण्यासाठी औषध हवं, औषधासाठी चांभाराच्या भिशीतून रकमेची मागणी करायला पाहिजे· नवऱ्याला बरं वाटण्यासाठी 'पाटलाच्या रत्नानं' चांभाराच्या भागीकडं शब्द टाकला·[११]

या कुटुंबामध्ये पावित्र्य आहे· येथे 'खळाळ' मध्ये सारे निर्मळ वाटते· राजावाणी, वारकरी यांच्या बायका, किसनी (गाळ) खुळी चंद्री (ओझं) या पात्रांना आधारच नाही. नैतिकतेच्या प्रश्न नाही· त्यांच्यातली विशिष्टता सामान्यांची होत नाही· म्हणूनच कथेला मर्यादा पडतात· अनेकविध नाते दर्शविले आहेत पण त्यातला अंत:प्रवाह प्रत्ययाला येत नाही· प्रत्ययकारितेने यादवांना आणखीच मोठे यश मिळाले असते· गृहिणी, प्रिय सखी, विधवा, सासू-सासुरवाशीण अशी विविध रूपे पाहता येण्यासारखी आहेत· मोटक्या येशाला धुण्याचं निमित्त करून भेटायला जाणारी सुताराची तानी (धुणं), पूर्वाश्रमीची प्रिय सखी 'रकमा' तिच्या लग्नानंतर भेटते ती चौथ्या महिन्याचे पोट घेऊन.येथे अतृप्त युवक प्रियकर रामू मोटेला ठिगळ लावण्यासाठी गावात जाताना रकमाची भेट होते· पूर्वाश्रमीच्या प्रीती-स्मरणानेच कथा पुढे सरकते·

विधवा स्त्रियांचे जीवन खूपच विविधांगी आले आहे. 'मुंडरी' अब्रू सांभाळतच दिवस कंठणारी आहे. तर 'वरातीचा शालू' विकायला निघालेली अंजना अंतरंगातून बरीचशी पोखरली आहे. नव-याच्या आठवणीने विव्हळ होते. ही स्त्रीची सरळ सरळ दोन रूपे होत पण किसनी (गाळ) रांडमुंड बाई कुदांड्या म्हशीगत हाय.(पृ. १८) कंत्राटदाराचं कूळ म्हणून इतराना (गोपाला) तिनं कुत्रं केलं होतं. 'राजावाणी' जगणा-याची बायको भोगावच्या वतनदाराबरोबर निघून गेली. नव-याशी बेईमानपणे वागणारी स्त्री (पत्नी) सुध्दा चित्रित केली आहे.

अगदी एकाकी जीवन कंठणारी पात्रे खूप आढळतात. बायको पळून गेल्याने 'वारकरी' आणि स्वत:ला फसवून एकटाच जगणारा 'राजावाणी' ही पात्रे एकाकी तर आहेतच पण मरण येत नाही म्हणून जगणारी आहेत. मरणाशिवाय त्यांच्या जीवनात कोणतीच विशेष घटना घडणार नाही. म्हणूनच त्यांच्या जगण्याला अधिकच भकासपणा येतो.

वारक-याला भाऊबंदांनी लुबाडला तर त्याच्या चुलत्याने त्याची जमीन काढून घेतली. शेवटी पुन्हा एकलकोंडाच जगतो आहे.

कौटुंबिक जीवनात सुखापेक्षा दु:खच माणसाच्या वाटयाला येते या प्रकारचे चित्रण यादवांच्या 'खळाळ' मधील कथांत प्रामुख्याने येते.

<u>व्यक्तिमनाचे चित्रण -</u>

लेखक म्हणून 'खळाळ' या कथासंग्रहात आनंद यादवांच्या स्वतंत्र लेखन पिंडाचा आविष्कार होतो. असे मानले तर त्यांच्या लेखनाचे एक वेगळेपण या संग्रहात आविष्कृत झाल्याचे आढळते. 'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रसंग्रहात ग्रामीण सामूहिक जीवनाचे अधिक प्रमाणात चित्रण झाले आहे. तर 'खळाळ' मधील कथांत या ग्रामीण सामूहिक अथवा सामाजिक जीवनाच्या चित्रणाला गौणत्व प्राप्त झाले आहे व व्यक्तिमनाच्या चित्रणाला

प्राधान्य आले आहे· यादव सामाजिक चित्रणापेक्षा व्यक्तिमनाच्या चित्रणात अधिक रंगतात, असे या कथांमधून जाणवते·

यादवांनी व्यक्तिमनाचे चित्रण करीत असताना व्यक्तीच्या मनावरील ताणाचे चित्रण करण्याला महत्त्व दिले आहे· या मनावरील ताणांच्याद्वारा ते व्यक्ती मनाचा तीव्र स्वरूपाचा प्रत्यय देऊ पाहतात· हे त्यांनी आपल्या कथांत कसे साधले आहे, ते पाहू·

यादवांच्या कथांत मृत्यूसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा दारिद्र्या-सारख्या परिस्थिती सापेक्ष घटकामुळे अथवा स्त्रीपुरुष आकर्षण यासारख्या नैसर्गिक घटकांनी हा ताण निर्माण झाल्याचे चित्रण येते· 'वखार' या कथे-मध्ये दारिद्र्यामुळे निर्माण झालेल्या ताणाचे व ताण-उताराचे (रिलिफ) उत्तम चित्रण येते· सुब-या हा स्मशानाजवळ लाकडाची वखार चालवितो· दोन-तीन दिवसात एकही प्रेत जाळण्यासाठी आलं नव्हतं म्हणून त्याला कमाई झाली नव्हती व त्याच्या घरात खाण्याची पंचाइत पडली होती· सुब-या कुणाच्या तरी मरणाची वाट पाहतो आहे· लाकडं फोडणारी महारं पगारासाठी तगादा लावत आहेत· तो कुणाच्यातरी मरणाची कल्पना करीत असतो· त्याच्या मनात येत, "परवा दिशी गल्लीत साप निघाला· त्यो कुठे गेला कुणाला ठाऊक ! मी बी लेच्या भयं साप निघालायं म्हणून कुणालाचं बोललो नाही··· पवाराच्या घराच्या बाजूनंच असा गेला. त्येच्या वैरणीत गेला असलं· पवार वैरण काडाय गेला म्हंजे वैरण सपता सपता··· " (वखार पृ·६८)

भाकरी घेऊन आलेली पोरगी ज्यावेळेला सांगते, "बाबा जनवाड्याचा आजा मेला नव्हं·' तेव्हा आपल्याला गि-हाईक मिळाले या कल्पनेने त्याच्या कानात एकाएकी प्राण येतो खरा पण लिंगाड्याच्या जातीत मढी पुरल्यात हे लक्षात येऊन त्याचा चेहरा दुस-याच क्षणी सुतकी दिसू लागतो· कुणा एकाच्या गणा भोसल्याच्या मृत्यूने वखारीतले वातावरण चैतन्यमय बनते·

महारांना पैसे, मंजीला दहा रुपये दिले जातात. घरी परताना रस्त्यावर पडलेलं एक फूल उचलून तिनं केसात खोवलं. जीवनातल्या विसंगतीचा प्रत्यय वाचकाला येतो. मनावरील ताणाचे व ताणउताराचे उत्तम चित्रण या कथेत केले गेले आहे.(पृ.७१)

'वखार' कथेप्रमाणेच अनेक कथांतून दारिद्र्यामुळे माणसाच्या मनावर ताण कसा निर्माण होतो. याचे चित्रण करून यादव व्यक्तिमनाचे दर्शन घडवितात.

वैधव्याच्या सोबतीने थैमान घालणारे दारिद्र्य अंजनाला 'वरातीचा शालू' विकायला लावते. पंचमीचा सण म्हणून मुलांना भात करून घालायचा तिचा विचार आहे. तांदळासाठी पैसे हवेत. पैशासाठी शालू विकायची पाळी येते. पैसे देऊन तरी रेशन दुकानामध्ये (कंट्रोल) तांदूळ मिळेल की नाही या विचाराने ती पोखरते आहे. पती प्रीतीची निशाणी म्हणून शालू जपायचा की मुलांना भात करून घालायचा अशा विचार आवर्तात ती सापडली आहे. एका बाजूने व्यावहारिकता आणि दुसरीकडे भावनिकता यांच्या कात्रीत सापडल्याने तिच्या मनातील दुःखाची तीव्रता वाढली आहे. (पृ.१२)

'गाळ' काढत असताना निसरडी झालेली पायरी कोणत्याही क्षणी केव्हाही पाय घसरून विहीरीत पडण्याची भीती आहे. खोल विहीरीच्या निसरड्या पायरीवर काम करायचं म्हणजे कोणत्याही क्षणी मरणाला आमंत्रणच दिल्यासारखं आहे. कंत्राटदाराचं कुळ म्हणून रांडमुंड किसनी, पावलीसाठी मोठा दगड उचलू लावणारा तळपाटीचा सख्या, भिम्या, गण्या, गोंधा वगैरे मालकाची माणसं प्रत्येक पायटीवर आणि प्रत्येक पाटीला जीव धरून काम करत आहेत. अदृश्य रूपात तेथेच जवळपास कुठेतरी यम वावरत असावा इतकी त्या वातावरणात ती माणसं दबलेली आहेत.(पृ. ३९-४०)

आपल्या एकुलत्या एक मुलाचा - दिनाचा - प्रपंच 'सून' हौसा व्यवस्थित करते का नाही या विचाराखाली दिनाची म्हातारी आई दबलेली आहे. दोन वर्षे त्या विचाराखाली म्हातारी जीव टांगणीला लावून राहते आता सूनेला दिवस गेल्याने म्हातारी सासू सूखावली आहे.(पृ. १२१)

'मुंडरी' स्वगत पध्दतीने मांडलेली कथा तिच्या मनातील संघर्ष बोलक्या स्वरूपात साकार करते. रूपवान स्त्रीवर वैष ्क नजर डोंगऱ्याच्या राण्याची आहे. इतर खूप लोकांची तशी चाल आहे. बाहेरून कुलूप घालायला लावून ती आत रात्र कंठते या घटनेवरून तिची भीती किती जबरदस्त आहे याची कल्पना येते. (पृ. ७४)

'माघारी' मधील केदारी पवार, 'मोट' मधील बाबू या दोन पात्रांवर पूर्वी कधी तरी ताण होता असा भास होतो. आता ताण ओसरल्याची जाणीव येते. केदारी पवार पुन्हा तारूण्यात जाणे शक्य नाही किंवा बाबूचा हि-या बैल परत जिवंत होणेही शक्य नाही. ताण ओसरल्याची ही जाणीव गतस्मृतीशी सतत संपर्क साधते. आपले हरवलेपण आपणास परत मिळणार नाही याची खात्री असूनही त्याच त्या घटनेभोवती ही पात्रे फिरत राहतात.

'बाळापाडा' ही कथा बापूचीच आहे. बाळापाडाशी अतिशय समांतर-समान पध्दतीने चालणारी कथा आहे. वासनेच्या बाबतीत आणि वासना विरेचनासंदर्भात असलेल्या वर्तणुकीबाबतीत अतिशय समानता आहे. ही कथा ध्यानात राहते ती बाळापाड्याची म्हणून नव्हेतर बापूची वासनापूर्तीची कहाणी म्हणून. नजरेसमोर साकारते ती बापूची बायको शेतमळ्याकडे बेंदराचं सामान घेऊन उताराच्या रस्त्याने पाणंदीतून येणारी अवघडलेली बाई म्हणून. बाळापाडा गायीसाठी वड करतो. बापू गवळ्याच्या शिब्बीला भितो. बायको मरणाचं ओझं

घेऊन झोपडीपुढं उभी आहे. प्रत्येक-प्राणी माणूस कुठे ना कुठे दबावा-खाली दबलेला आहे.

दिवसभरात एकदा तरी पोटाला मिळेल का नाही या चिंतेत 'ओझं' कथेतील जयशा, पांडा आणि दतबा ही आहेत. शरीराचं ओझं घेऊन जगणारी ही माणसं केवळ पोटाला कसं मिळेल या चिंतेने ग्रासलेली, काम मिळण्याची वाट पाहात आहेत, धडपड करीत आहेत. पोटाची चिंता सातत्याची व सर्वव्यापी अशी आहे.

चोरी करण्यात समाधान नाही. नेहमीच भीती असते म्हणून 'चाकरी' राहणा-या भिक्याचे तणावानंतरचे चित्रण आहे. थोरल्या पोरीचं वाण्याच्या दुकानातलं भावाच्या बारशासाठी चेंडू-खुळखुळा चोरला. भिक्यानं तिला झमामा झोडपली. ज्याच्यासाठी प्रामा-णिकपणाचा एवढा उपदव्याप केला तिच गोष्ट शेवटी घडली. खुळखुळा परत देईपर्यन्तच्या कालावधीत तो एका विशिष्ट ताणाखाली वावरतो. पोट भरण्यासाठी चोरी हा व्यवसाय म्हणून पत्करला तर माणूस ताणाच्या केवढया प्रचंड ओझ्याखाली जगत असतो याचे चित्रण या कथेत येते. (पृ. २३)

मृगाच्या पावसाने समाधान झाले तरी आर्द्राच्या पावसाने पेरण्या होतात. भुईमूग-चवळीची टोकणणी करायला रोजगाऱ्यांचा ताफा आहे. पाऊस जास्तच चळाळला आणि घातमोडीमुळे पेरणी खोळंबली. पावसापूर्वी टोकणणी संपावी असे मालकाला वाटते उलट पावसाने थोडा विसावा मिळतो अशी रोजगा-यांची विचारसरणी आहे. पाऊस चळाळल्याने रईत नाराज होतो पण घातमोडीमुळे दोन दिवस कॉक कॉक करीत घरी थांबलं पाहिजे म्हणून रोजगारी नाराज आहेत.

विलक्षण ताण आहे वारक-याचा परमेश्वराचे अस्तित्व आणि आपले निरर्थक जगणे या विषयीच तो साशंक आहे. अंतरंगामध्ये तो सातत्याने कुढत राहिला आहे. गार उकरून घरी परतणा-या नरसूच्या मनात मुलाच्या तापाबद्दलचा विचार सातत्याने आहे. कुणी आपणाला पाहू नये येथपासून तो मुलाचा ताप उतरावा येथपर्यन्त त्याचा विचाराचा सहज प्रवास आहे. प्रचंड तणावाखाली तो सातत्याने वावरत आहे. (बुधा)

प्रेमसंबंधाचे चित्रण करीत असताना माणसाच्या मनात प्रेमसाफल्याची जी आकांक्षा निर्माण होते तिचे चित्रण करताना स्वाभाविकपणेच मनावरील ताणाच्या चित्रणाला महत्त्व येते. 'ऋण' या कथेतील येशा हा तानीच्या निकट सहवासाची इच्छा करीत असतो, प्रयत्न करीत असतो. त्यामुळे त्याच्या मनावरती निर्माण होणा-या ताणाचे चित्रण करून त्याच्या मनातील हालचालीचा लेखकाने उत्कट स्वरूपात प्रत्यय दिला आहे. (पृ.२).'उन्हाचं 'या कथेत दुस-याशी विवाहबध्द झालेल्या प्रेयसीच्या मनात आपल्याला अजूनही जागा आहे का याचा अदमास घेणा-या रामूच्या मनात उलघालीचे चित्रण येते. ती आपल्या संसारात सुखी आणि सफल झालेली आहे, हे समजून त्याच्या मनावरचा ताण ओसरतो व तो दु:खीही होतो.(पृ.८१)

व्यक्तिमनाचा प्रत्यय देण्यासाठी यादव आपल्या पात्रांच्या संदर्भात स्वगताचा उपयोग करून त्यांचे अंतरंग प्रत्ययाला आणून देऊ पाहतात व पात्राच्या अंतरंगाचे दर्शन घडवितात. ज्या हि-या बैलावर बाबूने जीवापाड प्रेम केलेले असते तो मेल्यावर त्याच्या कातड्याची मोट हाकण्याचे त्याच्या नशिबी येते. या कथेतील बाबूच्या स्वगतातून त्याची मनाची उलघाल प्रकट होते.

त्या कथेतील शेवटचा भाग मनाला विशेष भिडतो. "..... हि-यानं जलमभर आणि जलम संपल्यावरबी पिकाला पाणी पाजलं...

आता हि-या हिरीत गेला, पाण्यातबी गेला··· (बाबू डोणग्यात गेल्यानंतर)··· हि-या! हि-या मोटबी तूच· पांगणबी तूच, चाबूक, वादी, जुपण्याबी तूच व्हय रं ? आणि मीबी तूच कसा झालास हि-या ? " (पृ· १७९) बाबूच्या या स्वगताने त्याचे दु:ख जाणवते· संवेदनशील वाचकही थरारून जातो· अंतर्मनाचे अती सूक्ष्म आणि अती सुंदर चित्रण सदर कथेत आहे·

'इंजेन' सारखी कथा ग्रामीण मनाचे चिंतनशील स्वरूपातून दर्शन घडविते· इंजेन च्या आगमनाने मोट, शेतातील खतपाणी, नांगरणी, कुळवणी व पेरणी सारखी कामं करणारी सोन्या-रूप्याची जोडी गेली· जनावरामध्ये मन गुंतल्याने राहिलेला सित्या भावविश्व उध्वस्त झाल्यावर मळा सोडून निघून जातो· त्याच्या मनातली उलघाल शब्दाशब्दांतून व्यक्त झाली आहे· व्यक्तीच्या सूप्त मनामध्ये अनेक भावनांचा कल्लोळ चाललेला असतो· त्यातला एक पैलू पकडून इंजेन सारखी कथा निर्माण झाली·

बाबू सित्या ही माणसं (शेतगडी) आपापल्या दु:खातच पूर्ण बुडलेली आहेत· हि-या बैलाचं मरण किंवा इंजेन येणं या घटनांचा किती खोलवरचा परिणाम येथे दर्शविला आहे ते भाव तसेच वाचकांच्या मनात संक्रमित होतात·

व्यावहारिक जगामध्ये सर्वच घटनांची पूर्ती होत नाही· अशावेळी माणूस त्या घटनांची पूर्णता स्वप्नरंजनाने आपल्या भावविश्वामध्ये करतो·

'तानीनं ताल धरून चोळ्या बडविल्या· छाती, कंबर, पोटऱ्या हादरत, हलत हुत्या.' (पृ·५ धुणं) येशाच्या शरीरामध्ये काम वासनेची एक सूक्ष्मशी लहर येऊन गेली असावी अशी शंका येण्याइतपण सूक्ष्म चित्रण केलं आहे· तानीनं चोळ्याचं पिळं दगडावर रचलं··· मधनंच एखाद्या चोळीचा पिळा अंग सैल सोडायचा· काठावरनं पाटाच्या पाण्यात पडायचा· येशा सांगतो, " पिळा पडला बघ पाटात "

"व्हय की ध्यानाच न्हाई माझं" तानी

माझं ध्यान तुझ्या पिळ्याकडं. पिळ्याच ध्यान तुझ्या पायाकडं, खाली, येऊ बघत्यात पाटात. हा: हा: हा: ! (पृ. ५) येशाच कुडतं पाण्यात भिजवून पायावर घेऊन तानी साबण लावू लागली" (पृ. ६) कुडतं काढून येशा ओंघळीला बसला. तानीनं पाठीवर पाणी मारलं. पाठीला साबण लावतीया काय मऊ मऊ हात मोकळाच फिरवतीया, वळखून येईना, येशा डोळं झाकून गप्प बसलाय... (पृ. ७) उमलू पहात असलेल्या दोन आसक्त जीवांची ही पूर्णतेला जावू पाहणारी प्रेम कहाणी आहे. गिर्रेबाज हिरव्या पानातील पिवळी केळ-तानी, गोल गरगरीत रामफळ गव्हाळ रंगाचं आहे. तानीच्या पोटागत रंग आहे. येशानं ते दाबलं... त्येच्या देखण्या अंगाला व्हट लावलं... गारगार वाटलं." (पृ. ८)

मोटेवर धुणं धुण्यासाठी आलेल्या तानीचा आणि येशाची ही प्रेमकहाणी चोरून चाललेली आहे. दोघांच्याही मनात एकमेकाबद्दल अतीव आकर्षण आहे. त्यादृष्टीने अंतर्मनाचे कंगोरे स्पष्ट होऊ पाहतात. तानी असे पर्यन्त मोट चालते. ती जाते आणि मोटेचा सोंदूर तुटतो. त्याच्या मनावरील तणाव नाहीसा होतो. अंजनाचा 'वरातीचा शालू ' बरेच सांगतो सुचवितो. चोचीला चोच आणि पिसाऱ्याला पिसारा लावून बसलेले, जरतारी नक्षीदार मोर शालूच्या काठावर आहेत. असा शालू नेसल्यावर अंजना दहा-बारा वर्षे मागे गेली तरंगत... तरंगत कालच लगीन झाल्यागत वाटत हुतं; वरात जणू रातीच निघाली हुती;गुळाचा उष्टा खडा खाताना अंग झिणझिणलेलं... समधा राती धुंद होत असलेल्या... वर्षानं पोटात राभा राहिला. फणसाच्या झाडागत अवघडून लांबनच नाग पंचमीचा सण पाहिला फुगडी घोडा खेळ खेळलाच नाही...परत आली नि कडकडलेल्या मिठीत गेली...(पृ.३२)

"... हया लुगड्यात पद्मिणीगत दिसतीयास तू '(पृ. ३२) पूर्वस्मृतीवरील ही कथा तिच्या मनाचे दर्शन घडविते. लग्नानंतरचे पहिले

वर्ष, पहिले प्रेम वगैरे सहसा विसरले जात नाही· पूर्वस्मृतीचा एखादा सुखद क्षण दु:ख विसरायला लावतो· माणसाला अशा घटनांतूनच क्षणजीवी सुख प्राप्त होते· सद्याचे दारिद्र्याचे वातावरण विसरायला ती सुखद पूर्वस्मृती खूपशी कारणीभूत आहे·

वैवाहिक सुखाच्या पूर्वस्मृतीप्रमाणे येऊ घातलेली आर्थिक सुबत्ता माणसाला सुख देते हैस घेण्यापूर्वीची जुने-यातली अनवाणी, म्हारणीगत दिसणारी बायना म्हैस घेतल्यावर खूपच बदलते· ती मन:चक्षूसमोर दिवास्वप्न रंगविते·

"कांसाडी भरून दूध, पायात त्याल घाटलेल्या नव्या कोर चपल्या कुरूकुरू वाजणा-या, अंगावर इकत घेतलंलं धाबळी लुगडं, दंडाला हिरवी पुणेरी चोळी, तिच्यात पैसं खवलेलं, कपाळाला ठळक कुंकू·

"···कुठं चाल्लीस बायना ?"

"··;जाती ब्या दूध घालायला·" (पृ·५५)

दिवास्वप्नाचा जरी भास झाला तरी ती बायनाची अंतर्मनातील खरी भावना साकार झाली आहे· म्हैस घेतल्याने आपल्यात होणा-या बदलाचे ते सुखासक्तीचे चित्रण आले आहे·

वखारीतील गडी माणसं (मालक - महारं) सतत कोणाच्या तरी मरणाची वाट पाहतात· पवार वैरण काढाय गेला म्हंजे वैरण सपता सपता ··· (पृ·६८) अशी दुस-याच्या मरणाची वाट पाहणारी, मनामध्ये त्याची कल्पना करणारी ही माणसं·

'वारकरी' या कथेत बायको पळून गेलेली, चुलत्याने शेत लुबाडलेले असा वारकरी कथेतील निवेदक विठ्ठल देवच आहे की नाही, अशी शंका मनात काढतो· ही कथा म्हणजे एका दु:खी मनाचे स्वगत आहे· या स्वगतातून त्याचे दु:ख, संशय, आर्तता इ·विविध भाव प्रकट होतात·

'गाळ,' 'ओझं' या कथा लेखकाने एकप्रकारच्या वस्तुनिष्ठपणे व लेखकाच्या त्रयस्थाच्या भूमिकेतून लिहिलेल्या आहेत. या कथेतील व्यक्तीं-च्या वर्तनाचे आणि त्यांच्या मनाचे उत्तम चित्रण येते. शिवाय त्याच्या जोडीनेच ग्रामीण जीवनातील सामाजिकतेचे प्रभावी असे चित्रण केले जाते. या संग्रहातील अन्य कथांच्याबाबत मात्र आपल्याला हे विधान करता येत नाही. कारण त्यामध्ये खास ग्रामीण स्वरूपाची सामाजिकता असे जिला म्हणता येईल, अशा सामाजिकतेचा प्रत्यय आपल्याला येत नाही. याचे कारण यादवांनी आपले लक्ष व्यक्तिमनाचे चित्रण करण्यावरच केंद्रित केले आहे.

ग्रामीण कथेची खास वैशिष्टये म्हणजे तिचे सामाजिकतेचे व त्या सामाजिकतेच्या संदर्भात ग्रामीण मनाचे चित्रण करणे हे होय. मराठी नवकथेने व्यक्तिमनाचे चित्रण करण्यावर भर दिला.

गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, वामन चोरघडे, जी.ए.कुलकर्णी यांच्या कथांमध्ये व्यक्तिमनाचे सखोल चित्रण आले आहे. एखाद्या क्षणाचा आधार घेऊन त्यासंबंधातले भाव आंदोलने टिपण्याचा यशस्वी प्रयत्न असतो. नागर कथासृष्टीचे खरे वैशिष्टय व्यक्तिमनातील ताणाचे चित्रण करणे होय. इतर सामाजिक संदर्भ नसतात. तशी एखादी व्यक्ती आणि त्याचे भावविश्व याचेच चित्रण येते. विलक्षण कल्पकता आणि प्रतीकात्मकता यांची सुंदर वीण असते.

'कातरवेळ' ची नायिका 'आक्का' विवाहानंतर (खूप दिवसांनी) माहेरी येते. सांजवेळी पूर्वाश्रमीच्या सख्याची - आविनाशची-आठवण येते. दाबून ठेवलेल्या भावनां पल्लवीत होतात. हे सूक्ष्मतर भाव गोख-ल्यांनी टिपले आहेत.[12] गंगाधर गाडगीळांची कथा अंतर्मनाचा विचार करते. 'भागलेला चांदोबा' मधील नायिकेच्या मनात स्वैर जीवनाची सुप्त आसक्ती क्षणिक का होईना कशी निर्माण होते याचे चित्रण केले आहे.[13]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

गाडगीळांच्या 'किडलेली माणसे', 'उन्हाळा' 'लक्तरे' अशासारख्या कितीतरी कथांतून व्यक्तिमनात दडलेल्या वासनाविकारांचे दर्शन घडविलेले आढळते.[१४]

सामाजिकतेला महत्त्व न देता व्यक्तिमनाचे चित्रण करण्यावर भर देणे. हे नागरकथांचे वैशिष्टय आनंद यादवांच्या 'खळाळ' मधील अनेक कथांत दिसून येते.

व्यक्तिमनाचे चित्रण करण्याला अनुरूप ठरावी अशाप्रकारची लेखन-शैली त्यांच्या या कथांमध्ये विपुल प्रमाणात आढळते. प्रतिमांचा उपयोग करून ही भाषा काव्यात्म बनते.

'इंजेन' आणल्यानंतर सित्याची, सोन्याच्याची किंमत कमी झाली. आपण जगलो काय आणि मेलो काय याची मालकास किंमत नाही ही गोष्ट सित्याच्या ध्यानात आली तेथले वर्णन सित्याच्या साक्षीने आले आहे.

"मुंडकं तुटून मेलेल्या जनावरांच्या मुडधागत दिसणारी तेलाची दोन ब्यारेलं बैलांनी बातच जाऊन ढेचा खाईत खाईत वडून आणली." (पृ.१६१) 'जळक्या कुर्डाईलचं तीन डबं कसाबानं चरबी भरलेल्या डब्यागत दिसत हुतं.' (पृ.१६३) मेलेल्या बैलाच्या पायाचं सांधेहाड पडल्यागत हॅंडिल पडलं हुतं. से पायात अडकलं' (पृ. १६३) भावनिक स्वरूपाचा आशय व्यक्त करण्या-साठी कथा तशा स्वरूपाची भाषा वापरली गेली आहे. तशी वातावरणा-ची निर्मितीही झाली आहे.

विरोध विकासाचे चित्रण 'वरातीचा शालू' मध्ये आहे. पूर्व-स्मृतीच्या पद्मिणीच्या रूपात ती स्वतः आठवते. त्यावेळी तानी जुणेरात पाय आडकून उंबऱ्यात पुढे आदळली (पृ. ३२) बाबाचं मुंडं घातलेल्या गण्या पळत येवून पाणी पिऊन बाहेर गेला. (पृ. ३३) विरोध विकासाने कथे-तील अर्थपूर्णता वाटते. भावनाची तीव्रता वाढली आहे.

अनेक ठिकाणी चेतनगुणोक्तीचा वापर करून त्यांनी व्यक्तिमनाचे चित्रण केलेले आहे. मोटंच सोंदूर तुटल्यावर वाऱ्याच्या कानात वरची झाडं खुसरकुसून हसली (धूर्ण), आटीव अंगाची, काळीभोर, टिक्की म्हेस, अवघडून दिसात पडलेल्या बाईगत बसलेली... आज वील, उद्या वील... (सुख) मानवी मनातील भावनांचा आरोप इतर जीवनसृष्टीवर किंवा वस्तूवर करावयाचा ही यांची काव्यात्मकता दिसून येते. कथेतील प्रत्येक वस्तू सजीव आहे असे मानून त्याला कलात्मकता देण्याचा प्रयत्न केला आहे. कुदळ मारल्यामुळे तोंड वरून कुरकुरली (९८). कुडिच दुष्काळामुळे लागण पडून आहे (१३१)

याप्रकारची भाषा वास्तवाचे चित्रण करण्यासाठी नव्हे, तर व्यक्तिमनाचा प्रत्यय देण्यासाठीच वापरली आहे हे जाणवते. संपूर्ण कथेतून आर्त, भावाकूल अशा वृत्तीचा प्रत्यय दिला जातो.

समीक्षकांची विविध मते -

'खळाळ' या कथासंग्रहाबद्दल समीक्षकांनी प्रकट केलेल्या मतामधून यादवांच्या नागर अभिरूचीचा निर्देश केला जातो.

आपल्या साहित्य निर्मितीच्या वेळची परिस्थिती सांगताना त्यांनी केलेले विवेचन महत्त्वाचे वाटते.

"आरंभी मी ग्रामीण साहित्याचा विचार करत असताना कलावादी विचारांचे प्रभावी वातावरण माझ्याभोवती होते. त्या वातावरणाचा प्रभाव माझ्यावर कमीअधिक प्रमाणात पडत होता, नाही असे नाही."[15] हे त्यांचे मत 'खळाळ' कथासंग्रहासंबंधाने यथार्थ वाटते.

म.द. हातकणंगलेकर यादवांचा कथाकार म्हणून विचार करताना म्हणतात,
"कविप्रकृतीचे ग्रामीण कथाकार असा त्यांचा पिंड बनला. त्यांची ग्रामीण जीवनाची आत्मनुभूती दीनदुबळ्याबद्दलची कणव, मातीची ओढ हे सर्व गुण जातिवंत आणि कसदार होते पण त्याचबरोबर गुणांना व जाणिवेला

कलात्मक संघटन व आकार प्राप्त करून द्यावा असा उत्कट ध्यासही त्यांना होता... यादवांचा 'खळाळ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यातील 'मोट' 'धुणं' यासारख्या कथांतील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरित झाले. त्यातल्या थंडगार, खळाळत्या लावण्याने मनाला पालवी फुटली. त्यांच्या या कथांत खेड्यातील जीवनाचे आकुळ आकलन दिसते. या आकलनाला कथारूप देतात. सुरावटीच्या रचनेसारखी कथेची रचना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि चिंतनशील निवेदनाची एक वेगळी बंदिश निर्माण केली. दु:खाची मूळ आर्तता, ते भोगत असतानाच त्याच्या चिंतनात वृत्ती बुडवून टाकल्यामुळे या आर्ततेला प्राप्त होणारे नादमय सौंदर्य, याबरोबरच भाषेच्या, प्रतिमांच्या सुप्त लावण्यमयतेचा चाललेला शोध यामुळे यादव ग्रामीण कथेला आविष्काराचे एक अभिनव परिमाण देवून या कथेचे एक नवे घराणे निर्माण करीत आहेत असे लोभसदृश्य काही काळ दिसले.' १६

म.द.हातकणंगलेकर यांनी प्राधान्याने यादवांच्या नागर स्वरूपाच्या कलात्मक जाणीवेचा निर्देश केलेला आहे. प्रल्हाद वडेर हे 'खळाळ' मधील आशयाचा, अभिव्यक्ती वैशिष्टयांचा निर्देश करताना त्यामधील उणीवांचा नेमका निर्देश करतात.

' 'खळाळ' मध्ये यादवांच्या चोवीस अनुभवांचा समावेश आहे. मी त्यांना कथा मुद्दामच म्हटलेले नाही. (नवी मराठी कथा अनेक वाङ्मयप्रकाराशी एकाच वेळी सलगी करू लागली आहे. हे सत्य ध्यानात घेऊनही) यादवांच्या या लेखनामागे पुन्हा एक विशिष्ट भूमिका आहे हे एक त्यांचे वैशिष्टय म्हणता येईल. यापूर्वी अशी भूमिका मांडण्याची वा घेण्याची इतर कोणा ग्रामीण लेखकाला कधी आवश्यकता वाटली नव्हती. आपल्या कथेत ग्रामीण बोलीचा अतिरेकी वापर आहे." १७

' 'खळाळ' मध्ये यादवांनी त्यातील काही अनुभव स्वगताच्या स्वरूपात मांडले आहेत. किंवा त्याहून स्पष्ट सांगावयाचे झाल्यास चक्क दिवाकरी

'नाटयछटे'च्या रूपात साकार केले आहेत. यादवांच्या मधील कथाकार अनुभवाचे सरळ निवेदन न करता तो आणखी एक निवेदक निर्माण करतो. व त्याच्यात तोंडून कधी चिंतनाच्या स्वरूपात (वारकरी) कधी दोन व्यक्तींच्या संवादातून (मुंडरी, माणूस, सासुरवाशीण, उनाच, सातवं) कधी स्वत:शीच बोलल्यागत म्हणजे स्वगतातून (सून) अशा सरमिसळ स्वरूपातून त्या व्यक्ती बोलतात. स्वत:च्या जीवनातल्या दु:खाना स्वत:शीच आकार देतात किंवा समोरच्या व्यक्तीपुढे आपले हृदय भडाभडा ओततात. त्यांची ही दु:खेही नेहमीची, प्रपंचातली आहे.... यादवांच्या कथांत त्यांना कोणतीच वेगळी पातळी लाभलेली नाही. त्यामुळे या नाटयछटासदृश्य लेखनात (किंवा ड्रमॅटिक मोनोलॉग्जमध्ये) यादवांचा अनुभव फुलतच नाही. 'खळाळ' वाचल्यानंतर हे जाणवणारे असमाधान आहे."[१८]

ग्रामीण साहित्यिकापासून असलेली अपेक्षा प्रकट करताना स्वत: यादव म्हणतात, "ग्रामीण साहित्याच्या चळवळीतून ग्रामीण साहित्यिकाला त्याच्या भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे भान देण्यावर जोर दिला जातो. याचे कारण त्याने केवळ सामाजिक परिस्थितीचे चित्रण सामाजिक दु:खाचे दर्शन आपल्या साहित्यातून घडवावे म्हणून नव्हे. व्यक्तिकेंद्रित रोमँटिक दु:खाचा पाडा त्याने शहरी साहित्यिकाप्रमाणे मिरवू नये. समग्र समाजजीवनाला त्याच्या साहित्याने पाठमोरे घालू नये. त्याचे भान ठेवावे, अशी त्याच्याकडून अपेक्षा असते."[१९]

ग्रामीण साहित्यिकाकडून असलेली अपेक्षा यादव 'खळाळ' मधील कथांत पूर्ण करतात, असे दिसत नाही.

<u>सारांश -</u>

'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रसंग्रहानंतर प्रसिद्ध झालेल्या आनंद यादवांच्या 'खळाळ' या पहिल्या कथासंग्रहात समाजाचे व व्यक्तिमनाचे

चित्रण कोणत्याप्रकारे झाले आहे याचा आपण विचार केला. ग्रामीण समाजजीवनाची फारच थोडी अंगे यादवांच्या या कथांमधून चित्रित झाली आहेत असे आपल्या ध्यानात आले. ग्रामीण जीवनातील भयंकर दारिद्र्याचे व तीव्र भाऊबंदकलहाचे चित्रण यादव 'खळाळ'मधील 'गाळ','ओझं' यासारख्या काही थोड्या कथांतून प्रत्ययकारीरीतीने करतात. रोजगाराचे जीवनही त्यांनी काही कथांतून उत्तमरीतीने चित्रित केले आहे. मात्र शेतकरी आणि शेतमजूर याशिवाय इतरांचे परस्परसंबंध या कथासंग्रहात जवळजवळ चित्रित होत नाहीत. उदाहरणार्थ ग्रामीण समाजरचनेचा अविभाज्य भाग बनून राहिलेल्या. जाती-जातीमधील चित्रण, स्पृश्य-अस्पृश्य यांच्यासंबंधाचे चित्रण, होताना आढळत नाही. शेतकरी आणि बलुतेदार यांचेही संबंध चित्रित होत नाहीत. ग्रामीण जीवनात प्रभावी असणा-या धर्मश्रध्दा, अंधश्रध्दा, संकेत यांचेही फारसे चित्रण आढळत नाही. याचे मुख्य कारण असे की, समाज हा यादवांच्या कथांचा प्रमुख विषय नसतो. व्यक्तिमनाचे चित्रण हा त्यांच्या कथालेखनाचा प्रामुख्याने विषय असतो. ( व्यक्ती मनही ग्रामीण वातावरणाने घडलेले व्यक्ती मन आहे.) असा प्रत्यय त्यांच्या कथां-तून फार कमी वेळा येतो

यादवांनी व्यक्तिमनाचे चित्रण करीत असताना व्यक्तीच्या मनावरील ताणांचे चित्रण करण्याला महत्त्व दिलेले आहे. मनावरील ताणांच्याद्वारा ते व्यक्तिमनाचा तीव्र स्वरूपाचा प्रत्यय देऊ पाहतात. व्यक्तिमनावरील हा ताण दारिद्र्यामुळे, मृत्यूसारख्या नैसर्गिक आपत्ती-मुळे अथवा प्रेमासारख्या मूलभूत भावनेमुळे निर्माण झालेला असतो. बैला-सारख्या प्राण्यावरची माया हेही ग्रामीण मनाचे वैशिष्टय क्वचित त्यांच्या व्यक्तिचित्रणात आढळते. त्यांच्या गाळ, ओझं यासारख्या सामाजिक आशय असलेल्या उत्तम कथांमध्ये मनाचे चित्रण लेखकाच्या तटस्थ भूमिकेतून केलेले आहे. या कथांचा अपवाद. वगळता अन्य व्यक्तीमनाचे चित्रण करताना ग्रामीण जीवनातील सामाजिकता ही लेखकानी चित्रण विषय न

बनवता केवळ पार्श्वभूमी दाखवून ठेवली आहे, असेच वाटते. व्यक्तिमनाचे चित्रण करणे हे वस्तुत: नागर नवकथेचे वैशिष्ट्य होय. ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना वस्तुत: सामूहिक स्वरूपाच्या जीवनाला अथवा सामाजिकतेचा महत्त्व मिळावयास पाहिजे. आनंद यादवांच्या या संग्रहातील अनेक कथा नागर कथेप्रमाणे मनाभोवती रुंजी घालणा-या व्यक्तिमनाची भावाकुल अवस्था प्रकट करणा-या अशा आहेत. त्यांची भाषाशैलीही भावाकुलतेला पोषक ठरणारी, चेतनगुणोक्तीचा आश्रय करून काव्यात्म बनणारी आढळते.

थोडक्यात सामाजिकतेचे चित्रण अल्पप्रमाणात करणारी व व्यक्तिमनाच्या चित्रणाला अधिक महत्त्व देणारी यादवांची 'खळाळ' मधील कथा ग्रामीण कथेच्या वैशिष्ट्यापेक्षा नागरकथेची वैशिष्टये अधिक प्रमाणात दाखवू लागली आहे, असे आढळते.

संदर्भ


१· व्यंकटेश माडगूळकर, 'माणदेशी माणसं,' कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, पहिली आवृती १९४९, पुनर्मुद्रण १९८०, पृ· ४·

२· व्यंकटेश माडगूळकर, कित्ता पृ· ८

३· व्यंकटेश माडगूळकर, 'माणदेशी माणसं,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, पहिली आवृत्ती १९४९, पुनर्मुद्रण १९८०, पृ २७·

४· शंकरराव खरात, 'सांगावा', 'मातीतलं मोती,' संपा· पंडित अनंत कुलकर्णी, प्रा· आनंद यादव, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे ३०, १९७०, पृ·२०६·

५· व्यंकटेश माडगूळकर, 'गावाकडच्या गोष्टी,' उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४ तिसरी आवृती, १९८२, पृ·१२६-१३३

६· व्यंकटेश माडगूळकर, 'गावाकडच्या गोष्टी,' उत्कर्ष प्रकाशन पुणे ४ तिसरी आवृत्ती १९८२, पृ·१९ ते २६·

७· व्यंकटेश माडगूळकर, 'माणदेशी माणसे,' कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९४९, पुर्नमुद्रण १९८०, पृ·८५-९३·

८· अण्णाभाऊ साठे, 'बरबाद्या कंजारी,' विद्यार्थी प्रकाशन, पुणे ९, १९६०, पृ·१-१३

९· ग·दि·माडगूळकर, 'कृष्णाची करंगळी,' (चोळी), कुलकर्णी ग्रंथगार शनिवार पेठ, पुणे ३०, द्वितीयावृत्ती १९७९, पृ·१०१–१११·

१०· शंकर पाटील, 'ऊन,' (आतड) इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, ३०, १९८०

११· शंकर पाटील, 'ऊन,' इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे ३०, १९८०

१२· भालचंद्र फडके, 'अरविंद गोखले यांची कथा,' कॉन्टिनेटल, प्रकाशन, पुणे ३०·

१३· श्री·पु·भागवत, 'गंगाधर गाडगीळांच्या कथा,' (संपा) कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, ३०·

१४· श्री·पु·भागवत, 'गंगाधर गाडगीळांच्या कथा,' (संपा) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०·

१५· आनंद यादव, 'मराठी साहित्य: समाज आणि संस्कृती,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८५, प्रास्ताविक पृ· ८

१६· म·द·हातकणंगलेकर, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' पुणे ग्रामीण साहित्य विशेषांक, जुलै–डिसेंबर, १९८०, पृ·५५–५६

१७· प्रल्हाद वडेर, 'अनुभव आणि आकार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९७९, पृ·१२०·

१८· तत्रैव पृ·१२१-१२२

१९. आनंद यादव, 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८५, पृ. ७२